सन २०१७-१८ करीता विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत (Creation of capital Assets-CCA) प्राप्त निधी वितरणास मान्यता देण्याबाबत .

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः विकेंस-२०१८/प्र.क्र.२६/का.-१९**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २८/०३/२०१८

वाचा -

१) आदिवासी विकास विभागाचे पत्र क्र. SCA-2018/CR-26/D-19,दि.२३.०२.२०१८
२) जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०३(१३) /२०१७-TSP, दि.१५/०३/२०१८

प्रस्तावना -

नंदुरबार जिल्हा हा अतिदुर्गम व मा.पंतप्रधान महोदयांनी घोषित केलेल्या ११५ Aspirational जिल्ह्यांपैकी असून येथील शेतक-यांसाठी शेडनेट हाऊस बांधणे योजना राबविल्यास शेतकरी बांधवांच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याने शेडनेट हाऊस या घटकाच्या प्रस्तावांना सन २०१७-१८ करिता असलेल्या विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत वाढीव अनुदानातून मंजूरी मिळण्याची विनंती केंद्र शासनास वाचा येथील क्र.१ च्या पत्रान्वये करण्यात आलेली होती. केंद्र शासनाने संदर्भाधिन दि.१५.०३.२०१८ च्या पत्रान्वये एकुण रु. ९५०.००लक्ष निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान केलेली असून निधी वितरीत केला आहे. सदर रु.९५०.०० लक्ष इतका निधी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय (Government resolution)-**

केंद्र शासनाने विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत सन २०१७-१८ करिता वितरीत केलेला रु. ९५०.०० लक्ष (रु. नऊ कोटी पन्नास लक्ष फक्त) निधी खालील नमूद योजनेकरिता तालिकेतील स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या निधीच्या मर्यादेत खर्च करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना राबविण्याचे ठिकाण | योजनेचे लाभार्थी | वितरीत करण्यात येणारा निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | Doubling income of tribal farmers through protected cultivation of vegetables in shade net house | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,नंदुरबार, जि.नंदुरबार | १६२ | ५४९.६५ |
| २ | | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,तळोदा,जि.नंदुरबार | ६३ | २१३.७५ |
| ३ | | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,धुळे | ५५ | १८६.६० |
| | | एकूण | २८० | ९५०.०० |

२. सदर योजनांचा खर्च मागणी क्र. टी-५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागसवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, (०२)(४३) विशेष केंद्रीय सहाय्य अन्वये केंद्रीय सहाय्य (केंद्र योजना), ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) (२२२५ E०४२) यामधील सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित असलेल्या निधीतून करण्यात यावा.

३. ज्या योजना प्रकल्प अधिका-यांमार्फत राबविल्या जातील त्या योजनांच्या लाभार्थ्यांची यादी , प्रकल्प राबविण्याबाबतचा आवश्यक दस्ताऐवज संबंधित प्रकल्प अधिका-यांमार्फत ठेवण्यात येवून तो योग्य प्रकारे जतन करण्यात येईल याची दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी व याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिकारी यांची राहील.

४. सदर निधी अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे. वितरीत निधीच्या मर्यादेत निधी आहरीत करून संबंधितांस वितरित करण्याची दक्षता आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी घ्यावी.

५. उपरोक्त मंजूर करण्यात आलेले अनुदान ज्या बाबींसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे, त्याच बाबींसाठी खर्च करावे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**६.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १४६ /अर्थोपाय, दिनांक २६/०३/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८११४६२१७४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e , cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.03.28 11:48:34 +05'30'

**(अ.रा.राजपूत)**
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग , मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
५. सहसचिव/उपसचिव,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. अवर सचिव, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
९. जिल्हा कोषागार अधिकारी,नाशिक/नंदुरबार/धुळे
१०. नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.